**१) फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४(१)(३) नुसार संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळा व आषाढी वारी - २०२३ च्या अनुषंगाने पालखी मार्गावर प्रतिबंधात्मक आदेश बाबत**

**संदर्भ :** - आळंदी पोलीस स्टेशन जाक्र/३३७७/२०२३ दि. ०५/०६/२०२३ अन्वये.

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रातील श्री. संत तुकाराम महाराज पालखी दि. १०/०६/२०२३ रोजी देहूगाव येथून निघून इनामदार वाडा देहुगाव येथे मुक्काम, दि. ११/०६/२०२३ रोजी विठ्ठल मंदीर, आकुर्डी येथे मुक्काम व दि. १२/०६/२०२३ रोजी तेथून निघुन हॅरीस ब्रीज, दापोडी ओलांडून पुणे आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये जाणार आहे. तसेच श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी दि. ११/०६/२०२३ रोजी निघुन गांधीवाडा दर्शन मंडप, आळंदी येथे मुक्काम करुन दि.१२/०६/२०२३ रोजी तेथुन निघुन दिघीगाव ओलांडून विश्रांतवाडी येथे पुणे शहर आयुक्तालय हद्दीत जाणार आहे. पालखी सोहळयामध्ये महाराष्ट्र व परराज्यातून लाखोच्या संख्येने वारकरी येत असतात.

सदर यात्रा उत्सव करीता संपुर्ण महाराष्ट्र व परराज्यातुन सुमारे ७ ते ८ लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. श्री. ज्ञानेश्वर महाराज व संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याचे कालावधीत आळंदी शहर व देहुगांव येथे लाखो भाविक मंदिर तसेच मंदिर परिसरात एकाच ठिकाणी एकवटलेले असतात. पालखी मार्गावर फुल, फळ, खेळणी विक्रेते हातगाड्या लावुन जमीनीवर बसुन त्यांचा माल विक्री करीत असतात. रस्त्याचे दोन्ही बाजुला त्यांचे बसण्यामुळे रस्त्याची रुंदी लहान होवुन पालखी सोहळ्याचे वेळी त्याचा परिणाम जाणवतो. त्यामुळे भाविक व दिंड्या यांना चालण्यास व रहदारीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी होवुन चेंगराचेंगरी होण्याची दाट शक्यता असते. गर्दीचा फायदा घेवून गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक आपला हेतु साध्य करतात. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो.

त्याअर्थी, मी विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४(१) (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार जारी केलेले प्रतिबंधात्मक आदेश कायम ठेवुन.

पुणे जिल्ह्यातील आळंदी येथील श्री. संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर व परिसर तसेच देहुगाव येथील श्री. संत तुकाराम महाराज मंदिर व परिसर तसेच संपुर्ण पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामधील पालखी मार्गावर दिनांक ०७/०६/२०२३ ते दिनांक १२/०६/२०२३ रोजी दरम्यान सुरक्षेच्या कारणास्तव पालखी मार्गाचे दोन्ही बाजुला हार, फुल, फळ, खेळणी विक्रेते, हातगाडीवाले, खाद्य पदार्थ विक्रेते व सर्व प्रकारचे फेरिवाले यांना विक्री करणे, थांबणे, विक्रीस बसणे, फिरणे अथवा इतर मार्गाने तेथे उपस्थित राहण्यापासुन प्रतिबंध करण्यात येत आहे.

उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने, फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहीती प्रसारमाध्यमे, पोलीस स्टेशन, सहा.पोलीस आयुक्त, परिमंडळीय पोलीस उपायुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**सदरचा आदेश दि -०६/०६/२०२३ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला आहे.**